| | | | |
|---|---|---|---|
| MHRG160001982015 | दावा दाखल तारीख | : | २५.०९.२०१५ |
| | दावा नोंदणी तारीख | | २५.०९.२०१५ |
| | न्यायनिर्णय घोषीत तारीख | : | १७.०४.२०२६ |
| | कालावधी | : | वर्षे महिने दिवस |
| | | : | १० ०६ २३ |

## पाली येथील मा. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात

(पिठासीन अधिकारी श्री.रा.अ.शिवरात्री)

**नियमित दिवाणी दावा क्र.३४/२०१५.                निशाणी क्र.१२६**

| | | |
|---|---|---|
| वादी | :: | **श्री. तातोबा काशिराम पाठारे, (मयत) तर्फे**<br>वय – .. वर्षे, धंदा – शेती,<br>**१) शांताबाई तोतोबा पाठारे,**<br>वय – ७२ वर्षे, धंदा –<br>**२) शशिकांत तातोबा पाठारे**<br>वय – ४९ वर्षे, धंदा –<br>**३) जयराम तातोबा पाठारे,**<br>वय – ४६ वर्षे, धंदा –<br>१ ते ३ रा. गोंदाव, पो. हातोंडा, ता. सुधागड, जि. रायगड<br>**४) यमुना चंदू सागळे,**<br>वय – ५१ वर्षे, धंदा –<br>रा. भेरव ता. सुधागड जि. रायगड. |
| प्रतिनिधीत्व | :: | **विधिज्ञ श्री. क्रांती कदम,** |
| प्रतिवादी | :: | **१) नारायण धोंडु पाठारे,**<br>वय–५१ वर्षे, धंदा–<br>रा. खोपोली, सरकार नगर (वर्धमान), दुसरा |

| | | |
|---|---|---|
| | | मजला, ता. खालापुर जि.रायगड.<br>**२) विमल सिताराम पाटील,**<br>वय– .. वर्षे, धंदा–<br>रा.ढेकू, पो. माणगाव बु, ता. सुधागड, जि. रायगड<br>**३) भिमाबाई महादू आंग्रे,**<br>वय–.. वर्षे, धंदा–<br>रा.वावे, पो. माणगाव बु, ता. सुधागड, जि. रायगड.<br>**४) लता काशिनाथ मालुसरे,**<br>वय– .. वर्षे, धंदा–<br>रा. साजगाव ता. खालापुर, जि. रायगड.<br>**५) लक्ष्मीबाई धोंडू पाठारे, (मयत)**<br>वय– .. वर्षे, धंदा–<br>वारस प्रतिवादी क्र. १ ते ४<br>रा. खोपोली, सरकार नगर (वर्धमान), दुसरा मजला, ता. खालापूर, जि. रायगड |
| **प्रतिनिधीत्व** | :: | **विधिज्ञ श्री. नितीन शेवाळे,** |

**:: न्या य नि र्ण य ::**

(दिनांक १७ एप्रिल, २०२६ रोजी पारित)

वादी यांनी प्रस्तुतचा दावा जाहिर ठरावाकरीता व निरंतर मनाई हुकूमा करीता दाखल केला आहे.

**दावा कथन संक्षिप्त स्वरुपात खालीलप्रमाणे**

**दावा मिळकतीचे वर्णन–**

०२. दावा मिळकतः– मौजे गोंदाव, तालुका सुधागड, जिल्हा रायगड येथील मिळकत खालीलप्रमाणे–

| गट नं | क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|
| २७८/१ | ०हे.३४.९आर |
| २७८/२ | ० हे.२१.२आर |

| | |
|---|---|
| ४५८ | ०हे .१३.०आर |
| ५८२ | १हे .१६.०आर |
| ८० | १हे .०२.१आर |

(*संक्षीप्तेकरीता येथून पुढे सदरहु मिळकतीस ''दावा मिळकत'' असे संबोधण्यात येईल.* )

**वादी यांच्या दाव्याचे थोडक्यात हकिगत खालीलप्रमाणे :–**

०३. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे मध्ये भाऊ–बहिण असे नातेसंबध आहे प्रतिवादी क्र. ५ हि आई आहे. मयत वादी–प्रतिवादीचे नात्याने चुलते आहेत. दावा मिळकत वादीचे ताबेकब्जेत असुन वादी दावा मिळकत कसत आहेत. दावा मिळकत वादी यांना त्यांचे वडील काशिराम तात्या पाठारे यांच्या कडून प्राप्त झाली आहे. दावा मिळकतीत वादींचा समान मालकी हक्क आहे. वादी मागील ५० वर्षे पासुन दावा मिळकत कसत आहेत. दावा मिळकतीच्या महसुल दप्तरी चुकीने प्रतिवादी यांचे नाव कुळकायदया नुसार लागले व ते नाव चुकीने लागल्याचे प्रतिवादींना माहिती होते व त्या बाबत त्यांना ज्ञान होते. त्यामुळे प्रतिवादींनी वादीला दावा मिळकतीची कसवणुक करण्यास परवानगी दिली. वादी दावा मिळकतीत भात, नाचणी, वरी पिकाची लागवड करुन उदर्निवाह करीत आहेत. दावा मिळकतीची वाटणी करण्याचे प्रतिवादींनी हमी देऊन देखील अद्यापपावेतो वाटणी केली नाही. त्यामुळे वादी यांना प्रस्तुतचा दावा दाखल करणे भाग पडले असे नमुद करुन त्यांनी दावा मिळकतीमध्ये वादीचा मालकी हिस्सा आहे असे ठरवुन मिळण्याची मागणी केली व वादी यांचा हिस्सा पृथक करुन वाटप होऊन मिळण्याची विनंती केली व त्यांचा वाटा पृथककरुन मिळे पावेतो निरंतर मनाई हुकूमाची मागणी केली

०४. प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांची कैफियत नि.१०९ वर दाखल केली. त्यांनी

त्यांच्या कैफियतीत नमुद केले की, वादीने दावा मिळकत केव्हाही वहिवाटली अथवा कसवणुक केली नाही. वादी दावामध्ये दावा मिळकतीचे मालक आहे असे म्हणत आहेत व त्याच वेळी दावा मिळकतीची वाटणी करुन मागितले असे म्हणत आहेत. त्यामुळे वादी परस्पर विरोधात कथने दाव्यात दाखल केले आहे असे नमुद करुन दावा मिळकतीशी वादींचा कोणताही संबंध नाही, वाटणी करुन मागण्याचा अधिकार नाही. प्रतिवादी यांनी कधीही दावा मिळकत विकण्याचा प्रयत्न केला नाही. त्यामुळे त्यांनी प्रस्तुतचा दावा नामंजुर करण्याची मागणी केली.

०५. वादी व प्रतिवादी यांच्या परस्पर विरोधी कथनाचा विचार करता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले. सदरचे मुद्दे नि.१११ निश्चित करण्यात आले. सदर मुदयांचे निष्कर्ष त्यांचे कारणमींमासेसह खालीलप्रमाणे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी हे सिध्द करतात काय, दावा मिळकत त्यांचे कायदेशीर मालकी कब्जेवहिवाटीत आहे ? | **नकारार्थी** |
| २. | वादी हे सिध्द करतात काय, दावा मिळकतीच्या महसुल दप्तरी प्रतिवादी यांचे नाव चुकीने लावण्यात आले ? | **नकारार्थी** |
| ३. | वादी हे सिध्द करतात काय, प्रतिवादी त्रयस्थ व्यक्तीचे हक्क दावा मिळकतीत निर्माण करीत आहेत ? | **नकारार्थी** |
| ४. | वादी हे सिध्द करतात काय, दावा मिळकतीत त्यांचा मालकी हक्क आहे ? असल्यास किती ? | **नकारार्थी** |
| ५. | वादी दावा मिळकतीत मागणी केल्याप्रमाणे घोषित होऊन मिळण्यास पात्र ठरतात काय ? | **नकारार्थी** |
| ६. | वादी निरंतर मनाई हुकूम होऊन मिळण्यास पात्र ठरतात काय ? | **नकारार्थी** |
| ७. | कोणता आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## – : कारणमिमांसा :–

**मुद्दे क्र.१ ते ६ करीता:–**

०६. प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी यांना समन्स बजावणी होवून देखील प्रतिवादी १ ते ५ दाव्यात हजर झाले नाही. त्यामुळे दावा विनाकैफियत चालविण्यात आले. वादी तातोबा काशीराम पाठारे यांनी त्यांचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.६३ वर दाखल केले व त्यांचा उलटतपास होऊ शकला नाही. दावा अंतिम युक्तीवादा प्रसंगी प्रलंबित असतांना. प्रतिवादी क्र.१ दाव्यात हजर झाले व त्यांची कैफियत नि.क्र.१०९ वर दाखल केले.

०७. त्यामुळे वादी यांनी त्यांचे वतीने द्रौपदाबाई पाठारे (वा.सा.२) यांचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.१०३ वर दाखल केले. त्यानंतर जयराम तातोबा पाठारे (वा.सा.३) यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.११५ वर दाखल करण्यात आले. तसेच सुधिर सिताराम पाठारे (वा.सा.४) यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.११६ वर दाखल करण्यात आले.

०८. प्रतिवादी यांनी प्रस्तुत दाव्यात कोणताही पुरावा नोंदविला नाही. त्यांनी तोंडी पुरावा देणे नाही या आशयाचे पुरसिस निशाणी क्र.१२१ वर दाखल केले व त्यांचा पुरावा बंद केला.

०९. वादी यांनी तोंडी पुराव्या व्यतिरिक्त खालील कागदपत्रांच्या आधार दाव्याच्या पुष्ठी करीता घेतला.

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशील | निशाणी क्र. |
|---|---|---|
| १. | गट नं.२७८/१ चा सातबारा उतारा | ६४ |
| २. | गट नं.२७८/२ चा सातबारा उतारा | ६५ |
| ३. | गट नं.४५८ चा सातबारा उतारा | ६६ |

| | | |
|---|---|---|
| ४. | गट नं.५८२ चा सातबारा उतारा | ६७ |
| ५. | गट नं.८० चा सातबारा उतारा | ६८ |
| ६. | प्रतिवादींना पाठविलेल्या नोटिसची स्थळप्रत | ६९ |
| ७. | पोस्टाच्या पोच पावत्या एकुण पाच | ७०/१ ते ५ |
| ८. | पोस्टाच्या एकत्रीतरित्या पावत्या एकूण पाच | ७१ |
| ९. | फेरफार नोंद क्र.१० व ६६४ चे | ७२ व ७३ |
| १०. | मुळ अखत्यारपत्र | ७४ |
| ११. | स.नं.४७८ चा मुळ ७/१२ उतारा. | ११९ |

१०. वादी यांनी त्यांचा पुरावा निशाणी क्र.१२० वरील पुरसिस अन्वये बंद केला.

११. वादी यांचे साक्षीदार द्रौपदाबाई पाठारे (वा.सा.२) यांचे पुराव्याचे अवलोकन केले असता, असे निदर्शनास येते की, साक्षीदार हे मौजे गोंदाव ता. सुधागड, जि. रायगड येथील सर्वे क्र.५६९ या मिळकतीचे मालकी कब्जेवहिवाटीत आहेत व त्यांची मिळकत दावा मिळकती जवळच सर्वे क्र.५८२ च्या लगत आहे. त्यांनी त्यांच्या पुराव्याच्या शपथपत्रात नमुद केले, दावा मिळकत सर्वे क्र.५८२ ही मिळकत तातोबा पाठारे हे वाडवडिलांपासुन तेच कसत आहेत व मिळकतीमध्ये भात, कडधान्याचे पिक घेत आहेत. दावा मिळकतीत प्रतिवादी कधीही कसवणुक केले नाही व करीत नाहीत असे नमुद केले.

१२. त्यांच्या उलटतपासा दरम्यान त्यांनी वादी कोणती जमीन कसतो, कोणत्या शेतात भात शेती करतो, वरकस जमीन कोणती आहे हे त्यांना माहिती नसल्याचे त्यांनी नमुद केले.

१३. वादींचे साक्षीदार जयराम पाठारे (वा.सा.३) यांनी त्यांचे पुराव्याचे शपथपत्रात नमुद केले की, त्यांनी वादी यांनी नि.क्र.६३ वर पुराव्याचे शपथपत्र दिले

आहे असे नमुद केले व दाव्याच्या अंतिम युक्तीवादा प्रसंगी प्रतिवादी यांनी कैफियत दाखल केल्यामुळे अधिकचा पुरावा नोंदवावा लागत आहे असे नमुद केले.

१४. त्यांच्या उलटतपासा दरम्यान त्यांनी नमुद केले की, प्रतिवादी यांचे वडिल धोंडु व त्यांचे वडिल विठ्ठल तातोबा हे सख्खे भाऊ होते. त्यांनी दावा मिळकतीचे सात बारा उता–यात त्यांचे व त्यांचे भावंडाचे नावे नाहीत असे नमुद केले. दावा मिळकत ते वहिवाटीत असल्याचे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा नसल्याचे त्यांनी मान्य केले. त्यांनी त्यांचे वडील तातोबा पाठारे यांना त्यांच्या वाटयास साडे तीन एकर जमीन आली होती परंतु, त्यांनी त्याची विक्री केली व आता केवळ त्यांच्या हिस्सास दिड एकर जमीन आहे असे नमुद केले. दावा मिळकती प्रतिवादी यांच्या मालकी कब्जेवहिवाटीत आहे असे नमुद केले.

१५. सुधीर सिताराम पाठारे (वा.सा.४) यांनी त्यांच्या पुराव्याच्या शपथपत्रात नमुद केले की, त्यांच्या गट क्र.४७८ या मिळकतीच्या पुर्वे दिशेला वादी यांची मिळकत गट क्र.४५८ क्षेत्र ० हे.१३आर. ही मिळकत असल्याचे नमुद केले व दावा मिळकत तातोबा पाठारे यांच्या मालकी कब्जेवाहिवाटीत असुन पुर्वी पासुन ते कसत असल्याचे त्यांनी नमुद केले व सदर मिळकतीमध्ये भाताचे व इतर पिकांचे उत्पन्न घेत असतात असे त्यांचे पुराव्यात नमुद केले.

१६. वादी यांच्या विधिज्ञांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये दावा मिळकतीच्या अंतिम युक्तीवादा प्रसंगी प्रतिवादी यांनी त्यांची कैफियत दाखल केली. त्यांनी त्यांच्या युक्तीवादात नमुद केले की, दावा मिळकत सामाईक आहे. त्यामुळे त्या मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी यांचा हक्क आहे. सदर मिळकतीचा ताबा वादी यांच्याकडे असुन ते फसवणुक करुन वहिवाट करीत आहे. सातबारा उता–यावर प्रतिवादी यांची नावे आहेत व तलाठी कार्यालयात जुने कागदपत्रे उपलब्ध नाहीत असे प्रमाणपत्र तलाठी यांनी दिले

आहे. साक्षीदार यांनी दावा मिळकत वाडवडिलांपासुन वादी कसत असल्याचे त्यांनी नमुद केले. त्यामुळे दावा मिळकत वादी यांच्या कब्जेवहिवाटीत असल्याचे नमुद केले.

१७. प्रतिवादी यांच्या विधिज्ञांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये नमुद केले की, दावा मिळकत या त्यांच्या मालकी कब्जेवहिवाटीत आहेत. दावा मिळकतीची विक्री कुळ कायद्यांतर्गत झाली आहे व त्यामध्ये वादी यांचे नाव नाही. वादी यांचा मालकी दर्शविणारा कोणताही पुरावा पटलावर उपलब्ध नाही असे नमुद करुन त्यांनी प्रस्तुतचा दावा खारीज करण्याची मागणी केली.

१८. वादी यांच्या विधिज्ञांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये नमुद केले की, दावा मिळकत ही केवळ वादी यांच्या कब्जात नसुन ती सामाईकपणे वादी व प्रतिवादी यांच्या कब्जात आहे असे नमुद केले. प्रतिवादी यांनी वादींचा कब्जा असल्याची बाब नाकारली व उलटतपासा दरम्यान देखील त्यांनी दावा मिळकत प्रतिवादी यांचे ताब्यात आहेत असे प्रश्न विचारले व वादींचे साक्षीदारांनी नाकारले. अशा परिस्थीतीत केवळ कागदपत्रे प्राप्त होऊ शकली नाही, नष्ट झाले या कारणामुळे दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र कुटुंबाच्या होत्या हे दर्शविणारा कोणताही पुरावा पटलावर प्राप्त झाला नाही.

१९. वादी यांनी फेरफार नोंद क्र. १०(नि.७२) व ६४४(नि.७३) मध्ये दावा मिळकती नसल्याचे निदर्शनास येते. या अन्वये एकत्रकुटूंबाच्या मिळकतींचे वाटप झाले होते हि बाब फेरफार क्र. ६४४ अन्वये निदर्शनास येते. सदरचे वाटप हे १४.११.१९८० रोजी झाल्याचे निदर्शनास येते. फेरफार नोंद क्र.१०(नि.७२)अन्वये वादी यांचे वडिल काशिराम यांना त्यांच्या नावे काही मिळकती प्राप्त झाल्याचे निदर्शनास येतात. परंतु, त्यामध्ये दावा मिळकतीचा उल्लेख नाही. त्याच प्रकारे फेरफार नोंद क्र.६४४ दि.१४.११.१९८० या द्वारे तातोबा काशीराम पाठारे यांना वाटपात काही मिळकती प्राप्त झाल्याचे निदर्शनास येते. प्रतिवादी यांचे वडिल धोंडु पाठारे यांना देखील दावा मिळकत

या फेरफार नोंद क्र.६४४ मधील वाटपामध्ये प्राप्त झाल्याचे निदर्शनास येते नाही. एकंदरीतच फेरफार नोंद क्र.६४४ (नि.७३) अन्वये कौटुंबिक मिळकतीचे वाटप आपसात करण्यात आल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे दावा मिळकती या मयत वादी यांचे वडील काशीराम पाठारे यांचे नावे होते हि बाब निदर्शनास येत नाही त्यामुळे दावा मिळकती या दि. १४.११.१९८० रोजी झालेल्या वाटपात नव्हते त्यामुळे त्या एकत्र कुटूंबाचे मिळकत नाहीत असा अनुमान काढता येते.

२०. दावा मिळकत ही एकत्रात होती, सामाईक होती हे दर्शविणारा कोणताही पुरावा वादी यांनी पटलावर दाखल केले नाही. या व्यतिरिक्त दावा मिळकत समाईक कब्जे वहिवाटीत आहे असा वादी यांचा दाव्यात कथन नाही. त्यामुळे केवळ दावा मिळकत समाईक कब्जे वहिवाटी आहे असा अनुमान काढता येणार नाही. तसेच प्रतिवादी यांनी दावा मिळकत वादींचे ताब्यात नाही या करीता उलटतपासाचा आधार घेतला. त्यांनी वादी यांचे साक्षीदार जयराम पाठारे (वा.सा.३) यांचे पुराव्याद्वारे दावा मिळकत प्रतिवादी यांचे मालकी, कब्जे, वहिवाटीत असल्याचे त्यांनी मान्य केले. परंतु दावा मिळकती पैकी गट क्र. ४७८ क्षेत्र ०हे १३आर हि मिळकत वादी यांचे ताबे कब्जात असल्याची बाब सुधीर पाठारे (वा.सा.क्र.४) यांचे पुराव्यातून प्राप्त झाले. उलटतपासा दरम्यान त्यांचा पुरावात त्यांचे वर अविश्वास दर्शविणरा कोणताही पुरावा प्राप्त झाला नाही. तसेच द्रोपदाबाई (वा.सा.२) यांचे पुराव्याचे आधारे त्यांचे जमिनीचे लगत असलेली जमीन वादी कसत असल्याचे ते सांगतात.केवळ साक्षीदार अशिक्षीत असलयाकारणाने तीला तीचा जमीनीचा गट क्रमांक सांगता आला नाही या कारणामुळे तीचा संपुर्ण पुरावा अविश्वासाहार्य आहे असे म्हणता येणार नाही. प्रतिवादी यांनी त्यांचे उलटतपासात सर्वे क्रमांकांचे आधारे त्यांचा पुरावा विश्वासाहार्य नाही हे दाखविण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांचे शेजारी असलेली मिळकत ही वादी कसतो हि बाब सिध्द होते.

त्यांच पुराव्याद्वारे गट क्र. ५८२ व ४५८ या मिळकती वादी पुर्वीपासून वहिवाटीत आहेत असे निदर्शनास येते व वादी यांच्या ताबे कब्जात असल्याचे दिसुन येते. वादी यांच्या विधिज्ञांनी सदरच्या मिळकती या केवळ वादी यांच्या कब्जेत नाहीत तर सामाईक कब्जात आहेत असे नमुद केले. त्यामुळे वादी व प्रतिवादी दोघेही गट क्र.५८२ व ४५८ या मिळकतीचे सामाईक कब्जेदार आहेत.

२१. दावामिळकती पैकी ग.क्र.२७८ हि मिळकत वर्ग दोन प्रकारची दिसून येते. दावामिळकतीचे ७ x १२ उता-यांचे अवलोकन केले असता सदरच्या मिळकती प्रतिवादी याचे नावे नोंदविले असल्याचे नमुद केले. वादी यांचे विधिज्ञानी युक्तीवादा मध्ये दावा मिळकती या कुळ कायदयान्वये प्रतिवादी यांचे नावे झाल्याचे नमुद केले. त्यामुळे दावा मिळकती वादी यांचे मालकीचे असल्याचे निदर्शनास येत नाही. वादी यांच्या नावे कुळ कायद्यांतर्गत झालेला आदेशास आव्हान दिले हे दर्शविणारा देखील कोणताही कागदोपत्री पुरावा पटलावर दाखल करण्यता आले नाही.

२२. वादी यांच्या विधिज्ञांनी त्यांच्या युक्तीवादा दरम्यान नमुद केले की, काही मिळकतीचे वाटप झाले होते व काही मिळकती वाटप होण्याचे राहिले होते व राहिलेल्या मिळकती सामाईक होत्या त्यांच्या युक्तीवादांचा विचार केला असता, वादी यांनी त्यांचा मालकी हक्क आहे हे दर्शविणारा अथवा दावा मिळकत हि त्यांच्या पुर्वजांना कुळ कायद्यांतर्गत प्राप्त झाले होते, त्यांच्या एकत्र कुटुंबाच्या वहिवाटीत होती हे दर्शविणारा कोणताही पुरावा पटलावर दाखल केला नाही. वादी यांचे विधिज्ञांनी युक्तीवादा दरम्यान जुनी कागदपत्रे महापुरात वाहुन गेली असे नमुद करुन त्यामुळे कागदपत्रे प्राप्त होऊ शकली नाही असे नमुद केले. त्यांचे या कथनाचे पुष्टी करीता त्यांनी तलाठी, पडघवली, ता. सुधागड यांचे प्रमाण पत्र(नि.१२८) वर दाखल केले. परंतु कागदपत्रे प्राप्त होवू शकले नाहीत हा पुरावा वादी यांची दाव्यातील मागणी करणे कामी पुरेशी आहे अथवा

नाही याचा विचार केला असता असे निदर्शनास येते की दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश १३ नियम १ मध्ये कागदोपत्री पुरावा मुद्दे निश्चित होतांना अथवा निश्चित होण्यापुर्वी दाखल करणे आवश्यक आहे. त्यांचे प्रकारे भारतीय पुरावा कायदा कलम १०१ अनुसार जो व्यक्ती दावा दाखल करतो व मागणी करतो त्याने दाव्यातील कथने सिध्द करण्याची जबाबदारी त्या व्यक्तीचे असते. त्यामुळे कागदपत्रे प्राप्त झाले नाही या कारणास्तव वादी आपली जबाबदारी नाकारु शकत नाही.

२३. वादी यांनी दावा मिळकती पैकी काही मिळकतींवर गट क्र.५८२ व ४५८ त्यांचा ताबा असल्याचे बाब सिध्द केले. या बाबींचा विचार केला परंतु मालकी प्रतिवादी यांचे असल्याचे दिसून येते. त्यामुळे वादी मालकी असणारे व्यक्तीचे विरोधात मनाईहुकूम प्राप्त करु शकत नाही. तसेच वादी यांनी दावा मिळकतीवर त्यांचा मालकी हक्क अधिकार असल्याचे सिध्द करु शकल्यामुळे ते घोषीत होवून मिळण्यास देखील पात्र ठरत नाही. त्यामुळे मुद्दा क्र. १ ते ६ चे उत्तर नकारार्थी नोंदवितो.

**<u>मुद्दा क्र. ७ करीता</u>:-**

२४. मुद्दा क्र. १ ते ६ चे उत्तर नकारार्थी नोंदविल्यामुळे खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

०१ दावा खारीज.
०२ दाव्याचा खर्च दोन्ही बाजूंनी सोसावा.
०३ येणे प्रमाणे हुकूमनामा तयार करावे.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला)**

SHIVRATRI RAJU ASHOK
Digitally signed by SHIVRATRI RAJU ASHOK
Date: 2026.04.17 14:42:28 +0530

**ठिकाणः पाली.** **(रा.अ.शिवरात्री)**
**दिनांकः १७/०४/२०२६.** **दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,पाली.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment is same word to word as per the original Judgment.

(a) Name of the Stenographer Ankush S. Waghmare
(b) Court Name CJJD & JMFC, Pali
(c) Judgment signed by P.O.on 17.04.2026
(d) Judgment uploaded on 17.04.2026